# मिठागरांच्या जागेवर बांधकामाला विरोध

## एमएमआरडीएने निविदा रद्द करावी : आव्हाड

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** मिठागरांच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम होऊ देणार नाही असे स्पष्ट करीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने बृहत आराखड्याला विरोध केला आहे. तर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) आराखड्याची निविदा त्वरित रद्द करावी अशी मागणी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी शुक्रवारी केली. पण एमएमआरडीएने मात्र सावध भूमिका घेत राज्य सरकारकडून लेखी आदेश आल्यानंतर निर्णय घेऊ असे स्पष्ट केले आहे.

मिठागरांच्या जागेवर परवडणारी घरे बांधण्याच्यादृष्टीने अभ्यास करण्यासाठी, तसेच जागेच्या विकासाचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी एमएमआरडीएने सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू आहे. यासाठीच्या निविदेला तीन कंपन्यांनी प्रतिसाद दिला. आता आव्हाड यांच्यासह पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी मिठागराच्या जागेवरील बांधकामास विरोध केला आहे. कोणत्याही प्रकारचे बांधकाम मिठागरावर होऊ देणार नाही अशी भूमिका घेतली आहे. त्यांच्या या भूमिकेनंतर आता एमएमआरडीएचा आराखडाही बासनात गुंडाळला जाणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अशात शुक्रवारी आव्हाड यांनी एक ट्विट करत महानगर आयुक्तांनी आराखड्यासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया रद्द करावी अशी मागणी केली आहे.

या संदर्भात राज्य सरकारकडून आदेश आल्यानंतर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी स्पष्ट केले आणि या विषयावर अधिक बोलण्यास नकार दिला.

# ‘मत’प्रेरित अल्पदृष्टी की दीर्घोद्देशी कठोर निग्रह?

## ‘लोकसत्ता विश्लेषण’ कार्यक्रमातून अर्थसंकल्पाचा वेध

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** तिसऱ्या लाटेचे संकट थोपवून अर्थव्यवस्थेची गाडी रुळावर येत असल्याचे दिसत असले तरी तिला अपेक्षित गती पकडता येईल काय, याची तड अवघ्या काही दिवसांवर आलेल्या २०२२-२३ सालच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून लागेल. सरकारच्या तिजोरीतील उत्पन्नवाढीसाठी पूरक ठरतील इतकी सुदृढता पायाभूत घटकांनी मिळविली नसताना, जमा-खर्चाची तोंडजुळवणी अर्थसंकल्पात कशी केली जाईल, याचा वेध शुक्रवारी, २८ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता ‘लोकसत्ता विश्लेषण’ कार्यक्रमातून घेतला जाणार आहे.

अर्थसंकल्पापूर्वी होत असलेल्या या विश्लेषणातून, प्रसिद्ध अर्थविश्लेषक मंगेश सोमण आणि ‘लोकसत्ता’चे संपादक गिरीश कुबेर हे १ फेब्रुवारीला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यापुढे असणारी आव्हाने जोखून, संभाव्य तरतुदी आणि घोषणांचा पट वाचकांपुढे खुला करतील. लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड प्रायोजक असलेला हा ‘लोकसत्ता-विश्लेषण’ कार्यक्रम दूरचित्रसंवाद माध्यमातून होत आहे. वाचकांनाही त्यांचे शंका-प्रश्न विचारून या मंथनात सहभागी होता येईल.

यंदाच्या अर्थसंकल्पावर विविध घटकांचे आशा-अपेक्षांचे ओझे आहे. सूट, सवलती, करमाफी, तरतुदीत वाढीच्या मागण्याही विविध कोनांतून सुरू आहेत. तरी हा संकल्प पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका पाहता, मतपेटीला लक्ष्य करणारा अल्पदृष्टीचा की दीर्घोद्देशी कठोर निग्रहाचा याचाही कस लागेल.

लसीकरणाच्या आघाडीवर देशाची दमदार कामगिरी राहिली. साथीच्या संकटाच्या मुकाबल्यासाठी सरकारकडून खर्च वारेमाप केला गेल्याचा सरकारचा दावा आहे. अर्थात वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) वाढलेल्या महसुलाची चांगली साथही सरकारी तिजोरीला मिळाली. यंदा भरघोस पिकाचा दिलासा अर्थव्यवस्थेला मिळण्याचाही अंदाज आहे. मात्र करोना निर्बंध हटविण्याच्या कासवगतीने अर्थव्यवस्थेचा निम्मा हिस्सा व्यापणाऱ्या सेवा क्षेत्राची कुंठितावस्था, राज्यांचा डळमळलेला वित्तीय डोलारा, परिणामी सर्वदूर बेरोजगारी आणि भरीला महागाईचा आगडोंब अशी गंभीर आव्हाने अर्थमंत्र्यांपुढे असतील. एअर इंडियाचा अपवाद केल्यास निर्गुंतवणूक आणि खासगीकरणाच्या आघाडीवर अपेक्षित यश न मिळाल्याने करोत्तर महसुलाची बाजूही लंगडी पडलेली असेल. यामुळे करोनाकाळाचा फटका बसलेल्या नोकरदारांना कोणता कर-नजराणा अर्थमंत्री देतील, याकडेही सर्वांचेच डोळे लागले आहेत.

लोकसत्ता विश्लेषण

सहप्रायोजक

लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि.

### अर्थसंकल्प-पूर्व विश्लेषण

**कधी? :** शुक्रवार, २८ जानेवारी २०२२

**वेळ :** सायंकाळी ६ वाजता

**वक्ते :**

- मंगेश सोमण, प्रसिद्ध अर्थविश्लेषक
- गिरीश कुबेर, संपादक, लोकसत्ता

● **प्रायोजक :** लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड

### सहभाग कसा?

दूरचित्रसंवाद माध्यमातून होत असलेल्या या कार्यक्रमात सहभागासाठी http:// tiny. cc/ LS_ BudgetVishleshan_2022 येथे नोंदणी आवश्यक.

क्यूआर कोड स्कॅन करूनही नोंदणी करू शकता.

# महाविद्यालयेही सुरू होणार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील करोना परिस्थिती नियंत्रणात आल्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारपासून शाळांसोबतच महाविद्यालयेही सुरू करण्याची तयारी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्यानुसार सर्व अकृषि विद्यापीठे, स्वयंअर्थसहित, अभिमत विद्यापीठ, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे प्रस्ताव पाठवला आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली.

राज्यातील पहिली ते १२वी पर्यंतच्या शाळा सोमवारपासून सुरू होणार आहेत. त्याच धर्तीवर महाविद्यालये सुरू करण्याबाबत सामंत यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीत करोनाचा प्रादूर्भाव कमी होत असल्याने महाविद्यालय सुरू करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव पाठवला आहे. या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्यानंतर महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येईल असे सामंत यांनी सांगितले.

# सव्वा कोटी रुपयांचे सोने, परदेशी चलनाची तस्करी; तिघांना अटक

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** सीमाशुल्क विभागाने मुंबई विमानतळावर केलेल्या दोन कारवायांमध्ये एक किलो ८०० ग्रॅम सोने व ६० हजार अमेरिकन डॉलर जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत सव्वा कोटी रुपये असून याप्रकरणी सुदान देशाच्या नागरिकासह तिघांना अटक करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

सुदानमधील नागरिक शारजामार्गे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आला होता. ग्रीन चॅनेलच्या पुढे गेल्यानंतर संशयावरून त्यांच्याकडील दोन बॅगांची झडती घेण्यात आली. त्यात त्याच्याकडे एक किलो ८६१ ग्रॅम वजनाचे सोने सापडले. हे सोने पावडर स्वरूपात होते. त्याच्या पुड्या तयार करून स्टिकरमध्ये लवपण्यात आल्या होत्या.

आणखी एका कारवाईत व्हीलचेअर बनवणाऱ्या कंपनीचा कर्मचारी सीमाशुल्क विभागाच्या जाळ्यात अडकला. त्याच्याकडून ४४ लाख १६ हजार रुपयांचे परदेशी चलन जप्त करण्यात आले आहे.

## माजी पोलीस अधिकारी ए. ए. खान यांचे निधन

**मुंबई :** वरिष्ठ आयपीएस ए. ए. खान (८१) यांचे अंधेरी येथील कोकिलाबेन रुग्णालयात शुक्रवारी निधन झाले. विशेष महानिरीक्षक म्हणून ते निवृत्त झाले होते. ८० व ९० च्या दशकात मुंबईत संघटीत गुंड टोळ्या सक्रिय होत्या. या टोळ्यांतील गुंडांच्या मुसक्या आवळून मुंबई पोलीस दलातील काही अधिकाऱ्यांनी आपला दरारा निर्माण केला, त्यापैकी खान हे एक होते. दहशतवादविरोधी पथकामधील त्यांची कारकिर्द गाजली होती. ए. ए. खान हे कुख्यात गुंड माया डोळस याच्या चकमकीमुळे प्रकाशझोतात आले होते. कडक शिस्तीचे असलेले खान कामच्या बाबतीत प्रचंड उत्साही होते. नुकतीच त्यांनी करोनावर मात केली होती. यारी रोड येथील कब्रस्तानमध्ये त्यांच्या पार्थिवावर दफनविधी पार पडला. माजी अधिकाऱ्यांसह त्यांचे जुने सहकारी अंत्यविधीला उपस्थित होते.

## गुंड सुरेश पुजारीचा ताबा आता गुन्हे शाखेकडे

**मुंबई :** मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने अखेर शुक्रवारी कुख्यात गुंड सुरेश पुजारीचा ताबा घेतला. फोर्ट परिसरातील कॅमेरा व्यावसायिकाकडून ५० लाख रुपये खंडणीची मागणी केल्याप्रकरणी त्याला अटक करण्यात आली. याप्रकरणी २०१८ मध्ये एका अल्पवयीन आरोपीसह गुन्हे शाखेच्या खंडणीविरोधी पथकाने सहा जणांना अटक केली होती. मुंबईत पुजारीविरोधात एकूण १७ गुन्हे दाखल आहेत. त्यातील तीन गुन्ह्यांमध्ये सुरेश पुजारी व गुंड रवी पुजारी दोघेही आरोपी आहेत.


**मध्य रेल्वे**

**शुद्धिपत्र**

ई-निविदा क्र.: आरआर/पीआर/डब्ल्यूसी/१६०९/२०२१-२२/२६. **कामाचे नाव :** स्मिथी शॉपच्या कल्याण एण्डपासून ते मुंबई एण्डपर्यंत शॉट ब्लास्टिंग मशिन नं. २२०६ ची रि-सायटिंग. ई-निविदा सूचना क्र.: आरआर/पीआर/डब्ल्यूसी/१६०९/२०२१-२२/२६च्या अनुसार दिनांकित २०.०१.२०२२ शुद्धिपत्र क्र. १ www.ireps.gov.in या वेबसाइटवर अपलोड करण्यात आले आहे.

रेलमदत हेल्पलाइन १३९

**पश्चिम रेल्वे**

**शुद्धिपत्रक**

**२०२१च्या निविदा क्र. डब्ल्यू ६४१-२२-२१-२६ ई-२३३७७७ करिता खालीलप्रमाणे भांडार निविदेचे वर्णन**

| विद्यमान वर्णन | सुधारित वर्णन |
|---|---|
| ट्रॅक मशिन्सकरिता सर्व्हो व्हॉल्वचे प्रापण **मेकः-** प्लास्सेर/स्टार-यूके/मूग | ट्रॅक मशिन्सकरिता सर्व्हो व्हॉल्वचे प्रापण **मेकः-** प्लास्सेर/स्टार-यूके/मूग/**सर्व्हो कंट्रोल्स** |

**अन्य सर्व शर्ती व अटी न बदलता त्याच राहतील.**

आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे**

**एलएचबी व्हील सेट्सवर ईसीए पद्धतीद्वारे सर्फेस डिफेक्ट शोधण्याचे काम**

**निविदा सूचना क्र.: सीडब्ल्यू/पीओ/डब्ल्यूसी/२०२१/०३ (कार्ये) आरटी२. दिनांक: २०.०१.२०२२.** मुख्य कार्यशाळा व्यवस्थापक, कॅरिएज दुरुस्ती कार्यशाळा, पश्चिम रेल्वे, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३ हे खालील कामासाठी ई-निविदाकरण पद्धतीद्वारे ई-बोली मागवीत आहेत. **कामाचे नाव त्याच्या ठिकाणासह: एलएचबी व्हील सेट्सवर ईसीए (एडी करन्ट ॲरे) पद्धतीद्वारे सर्फेस डिफेक्ट शोधण्याचे काम. (परि. ८००० नग). कामाचे अंदाजे मूल्य: ₹ ७८,१३,९९७.७६. इरठे: ₹ १,५६,३००/-. ई-निविदांच्या ऑनलाइन सादरीकरण आणि ई-निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ: १०.०२.२०२२ रोजी दु. १४.०० वा. आणि १४.३० वा.** बोली अर्ज आणि अन्य तपशील संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील: **www.ireps.gov.in**

आम्हाला लाइक करा twitter.com/WesternRly

**मध्य रेल्वे**

**विविध आयटम्सचे प्रापण**

डेप्यु. सीएमएम (सी) सीएसएमटी यांच्याद्वारा ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. तपशील खालीलप्रमाणे आहे: **अनुक्र. १. निविदा क्र.: ०३२०५००९ए. वर्णन:** एक्सएलपीई केबल. **परिमाण:** ३७५० मी. **टी.ओ.डी.:** १४.०२.२०२२. **अनुक्र. २. निविदा क्र.: ०३२०५०३६बी. वर्णन:** ट्रान्सफॉर्मर. **परिमाण:** २ नग. **टी.ओ.डी.:** २१.०२.२०२२. **अनुक्र. ३. निविदा क्र.: ०३२१५१३८. वर्णन:** सिग्नलिंग केबल. **परिमाण:** ५०० किमी. **टी.ओ.डी.:** २१.०२.२०२२. तपशील www.ireps.gov.in या वेबसाइटवर पाहता येईल.

**जाहि. निविदा सूचना क्र. ई-०१/२०२२ दि. २०.०१.२०२२**

रेलमदत हेल्पलाइन १३९

डाक जीवन बीमा Postal Life Insurance

**भारतीय टपाल विभाग, वरिष्ठ अधीक्षक टपाल घर यांचे कार्यालय, मुंबई उत्तर विभाग, विलेपार्ले पूर्व टपाल जीवन विमा विभागाकरिता थेट अभिकर्त्यांची नियुक्ती करण्याकरिता**

**पात्रता आणि अन्य मापदंड :**

१. **वयोमर्यादा :** कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ५० वर्षे.
२. **शैक्षणिक अर्हता :** मान्यताप्राप्त केंद्रीय/ राज्य सरकारच्या बोर्ड/ संस्थांमधून १०वी उत्तीर्ण.
३. **अनुभव :** आवेदनकर्त्याला विमा क्षेत्राबाबत तसेच विपणन क्षेत्रात कुशलता असणे आवश्यक.
४. **श्रेणी :** बेरोजगार/ स्वयंरोजगारित व्यक्ती, माजी जीवन विमा सल्लागार/ कोणत्याही विमा कंपनीचे माजी अभिकर्ता, माजी सैनिक, अंगणवाडी कर्मचारी, महिला मंडळ कर्मचारी, शाळेचे निवृत्त शिक्षक, स्वयंसहायता समूह पदाधिकारी इत्यादी टपाल जीवन विमा थेट अभिकर्तासाठी आवेदन करू शकतात.
५. जो उमेदवार थेट अभिकर्ता म्हणून निवडला जाईल त्याला टपाल विभागाने वेळोवेळी ठरविलेले कमिशन/ प्रोत्साहन भत्ता दिला जाईल.
६. थेट मुलाखतीद्वारे टपाल जीवन विमा/ ग्रामीण टपाल जीवन विमाचे उमेदवार नियुक्त केले जातील, नियुक्त उमेदवारांना आंतरिक/ व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात येईल.
७. नियुक्त उमेदवारांना परवाना परीक्षेसाठी हजर राहावे लागेल आणि परवाना परीक्षा व प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतरच परवाना देण्यात येईल.
८. निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरता परवाना देण्याकरिता रु. ५०/- आणि परवाना परीक्षेसाठी रु. ४००/- फी म्हणून जमा करावे लागतील.
९. निवड झालेल्या थेट अभिकर्त्याला रु. ५,०००/- राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र/ किसान विकास पत्र भारताच्या राष्ट्रपतींच्या नावे तारण म्हणून ठेवावे लागेल.
१०. थेट मुलाखतीकरिता उमेदवारांनी प्रवर अधीक्षक, टपाल जीवन विमा विभाग, मुंबई उत्तर विभाग टपाल कार्यालय, नंदा पाटकर मार्ग, विलेपार्ले पूर्व, मुंबई-४०० ०५७ येथे **दिनांक २४.०१.२०२२ ते दिनांक ०५.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० ते संध्या. ०५.०० वा.पर्यंत** आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्र तसेच पॅन कार्ड, आधार कार्ड (मूळ प्रत + १ झेरॉक्स प्रत), ३ फोटो व अन्य संबंधित दस्तावेजासोबत उपस्थित राहावे.




Reliance Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

**३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा**

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

| तपशिल | संपलेले तिमाही | संपलेले नऊ महिने | संपलेले तिमाही |
|---|---|---|---|
| | ३१ डिसेंबर, २०२१ | ३१ डिसेंबर, २०२१ | ३१ डिसेंबर, २०२० |
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | २,०९,८२३ | ५,६०,२१७ | १,३७,८२९ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | १८,५५२ | ५०,४७० | १३,८३२ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१,९१,२७१** | **५,०९,७४७** | **१,२३,९९७** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | २२,३९१ | ५८,६९५ | १५,१०३ |
| करपूर्व नफा | २५,२२७ | ६१,७३१ | १४,९८२ |
| कालावधीसाठी नफा* | २०,५३९ | ४९,८२४ | १४,८९४ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात)* | १५,०८५ | ६३,५३४ | ६,३५१ |
| भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी ₹१०/- मूल्याचा | ६,७६५ | ६,७६५ | ६,४४५ |
| पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी** | | | |
| प्रति इक्विटी समभाग मिळकत (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रत्येकी) (वार्षिकीकृत नाही) | | | |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | २८.०८ | ६८.०१ | २०.३३ |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | २३.७९ | ६३.६८ | २०.५१ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | २७.७६ | ६६.९३ | १९.९३ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | २३.५२ | ६२.६६ | २०.१२ |

*नियंत्रण विरहित स्वारस्य समाविष्ट
**३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा पुर्नमूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹ ६,९३,७२७ कोटी.

**टिपा:**

१. २१ जानेवारी, २०२२ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे.
२. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

| तपशिल | संपलेले तिमाही | संपलेले नऊ महिने | संपलेले तिमाही |
|---|---|---|---|
| | ३१ डिसेंबर, २०२१ | ३१ डिसेंबर, २०२१ | ३१ डिसेंबर, २०२० |
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | १,२२,८११ | ३,२६,३६४ | ७१,४५४ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | ५,४१५ | १४,९८० | ४,०५४ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१,१७,३९६** | **३,११,३८४** | **६७,४००** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | १२,४४० | ३३,५८२ | ६,९५७ |
| करपूर्व नफा | १२,४४० | ३३,५८२ | ६,८४१ |
| कालावधीसाठी नफा | १०,१६७ | २७,९९० | ८,६२८ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात) | १०,३९५ | २७,७४३ | ९,१६१ |

३. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आला आहे व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.
३१ डिसेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि नऊ महिन्याचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर **(www.bseindia.com / www.nseindia.com)** आणि कंपनीच्या वेबसाईटवर **(www.ril.com)** येथे उपलब्ध आहे.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/-
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २१ जानेवारी, २०२२

www.ril.com



**FORMULATED FOR SUCCESS!**

**SUPRIYA LIFESCIENCE LIMITED**

**CIN: U51900MH2008PLC180452**
207/208, Udyog Bhavan, Sonawala Road, Goregaon (East), Mumbai - 400063.
**Tel No.:** +91 22 40332727; **E-mail:** supriya@supriyalifescience.com; **Website:** www.supriyalifescience.com

**EXTRACT OF STATEMENT OF STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & NINE MONTHS ENDED 31ST DECEMBER, 2021**

**Rs. in Millions, except per share data**

| S. No | Particulars | Quarter ended 31-12-2021 | Quarter ended 30-09-2021 | Quarter ended 31-12-2020 | Nine Months ended 31-12-2021 | Year Ended 31-03-2021 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| 1 | Total revenue from Operations | 1,170.00 | 1,480.06 | 806.91 | 3,418.00 | 3,853.66 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional) | 400.70 | 777.54 | 245.53 | 1,317.65 | 1,673.10 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before Tax, (after Exceptional) | 400.70 | 777.54 | 245.53 | 1,317.65 | 1,673.10 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after Tax (after Exceptional) | 396.40 | 582.20 | 156.93 | 1,055.99 | 1,235.93 |
| 5 | Total Comprehensive income for the period comprising Profit/(Loss) for the period (after Tax) and other Comprehensive Income (after tax) | 392.46 | 581.78 | 156.37 | 1,051.67 | 1,234.69 |
| 6 | Equity Share capital | 160.97 | 146.37 | 146.37 | 160.97 | 146.37 |
| 7 | Other Equity | - | - | - | - | 2,543.05 |
| 8 | Earning per share (of Rs. 2/- each) (not annualized) | | | | | |
| | 1. Basic | 4.93 | 7.96 | 2.14 | 13.12 | 16.89 |
| | 2. Diluted | 4.93 | 7.96 | 2.14 | 13.12 | 16.89 |

**Notes:**

a) The Financial Results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on January 21, 2022. The Auditors of the Company have carried out Limited Review of the Unaudited Financial Results for the Quarter & Nine Months Ended December 31, 2021.

b) The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Stock Exchange websites (www.bseindia.com), (www.nseindia.com) and Company's Website (www.supriyalifescience.com)

**For Supriya Lifescience Limited**
Sd/-
**Dr. Satish Waman Wagh**
Chairman & Managing Director
DIN: 01456982

Place: Mumbai
Date: January 21, 2022

Adfactors 535